D:\Ghase Date-04-05-2015\kalam 88.doc87

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी आदेश

१६१३
जा.क्र.जिउनि/कात-६/रा.जि.मा.विदया.पतसं./का.क.८८/सन २०१६
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग,जि.रायगड
यांचे कार्यालय, दिनांक :- ०१/०८/२०१६.

वाचले :- १) एस्.बी.शिंदे प्र.ले.प. यांचेकडील या कार्यालयास दि.२७/१/२०१५ रोजी प्राप्त झालेला सन २००८-०९ ते २०१०-११ या वर्षाचा विशेष लेखापरिक्षण अहवाल.
२) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सह.सं.अधि.१९६० चे कलम ८३ अन्वये दि १०/९/२०१५ रोजीचा चौकशी आदेश.
३) चौकशी अधिकारी,श्री.दिनेश चव्हाण, स.नि.पेण यांचेकडील दिनांक ८/३/२०१६ रोजीचा कलम ८३ अन्वये चौकशी अहवाल.
४) छाननी अधिकारी श्री.चौधरी, स.नि.तळा यांचेकडील दि.११/५/२०१६ रोजीचा छाननी अहवाल.
५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.

ज्याअर्थी रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयासेवक सहकारी पतसंस्था मर्या., म्हाडा कॉलनी, अंतोरा फाटा, प्लॉट नं.सी-१४, पेण, जि.रायगड या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या अंतर्गत नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत करण्यांत आलेली असून संस्थेचा नोंदणी क्रमांक आरजीडी/एबीजी/बीएनके(ओ)/१०३/९१-९२, दिनांक ०१/०८/१०९१ असा असून ती या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते आणि,

ज्याअर्थी संदर्भ क्र. २,३ व ४ प्रमाणे संस्थेचे सन २००८-२००९ मध्ये रुपये ७,४३,९००/-, सन २००९-२०१० मध्ये रुपये ९,०५,९५५/-,सन २०१०-२०११मध्ये रुपये ७,०९,१७०/-असे एकूण रुपये २३,५९,०२५/- आर्थिक नुकसान झाले असल्याचे स्पष्टपणे निष्कर्ष नोंदविण्यांत आलेले आहेत. सदर संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीस तत्कालीन संचालक व तत्कालीन कार्यालय प्रमुख जबाबदार असल्याचे नमूद केले आहे. आणि,

ज्याअर्थी संस्थेचे तत्कालीन संचालक मंडळ व तत्कालीन कार्यालय प्रमुख संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असल्याने सदर आर्थिक नुकसानीस जबाबदार असणा-या व्यक्तींकडून रक्कम वसुल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत अधिका-यामार्फत चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची तरतूद आहे आणि माझी अशी खात्री झाली आहे की, सदर तरतुदीप्रमाणे कारवाई करुन संस्थेला झालेल्या आर्थिक नुकसानीची रक्कम निश्चित करुन ती रक्कम संबंधीतांकडून वसुल करणे आवश्यक असल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

D:\Ghase Date-04-05-2015\kalam 88.doc88

# आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पी.एम.खोडका, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयासेवक सहकारी पतसंस्था मर्या., म्हाडा कॉलनी, अंतोरा फाटा, प्लॉट नं.सी-१४, पेण, जि.रायगड या संस्थेत सन २००८-२००९ ते २०१०-२०११ या कालावधी त रु.२३,५९,०२५/- इतक्या रक्कमेच्या आर्थिक नुकसानीस संस्थेचे तत्कालीन संचालक व तत्कालीन कार्यालय प्रमुख यापैकी कोण कोण जबाबदार आहेत. आणि जबाबदार असणा-या व्यक्तींकडून संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची रक्कम व्याजासह वसुल करण्यासाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुदीनुसार संदर्भ क्र. १ ते ३ मधील अहवालातील मुदयांवर चौकशी करण्यांत यावी असे मी आदेश देत आहे.

सदर चौकशीसाठी श्री. बी.के. हांडे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पेण , ता.पेण, जि.रायगड यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या खालील नियमानुसार चौकशी करुन अपहारीत रक्कम रु.२३,५९,०२५/- इतक्या रक्कमेमुळे संस्थेला झालेल्या नुकसानीस कोण कोण जबाबदार आहेत व ते किती रक्कमेला जबाबदार आहेत हे निश्चित करुन त्या रक्कमा वसुली सबंधी आवश्यक ते आदेश दयावेत.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी चौकशी खर्चाची जबाबदारी निश्चत करावी व हा खर्च फी म्हणुन वसुली करण्यासंबंधी आवश्यक ते आदेश दयावेत. तसेच प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सदरची चौकशी खर्चाची जबाबदारी निश्चित करुन हा खर्च कोणाकडून वसुल करण्यांत यावा या बाबतचे आदेश दयावेत. प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यात पूर्ण करावी.

हा आदेश माझे सही व कार्यालयीन मुद्रेनिशी आज दि.१ /६/२०१६ रोजी दिला आहे.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ★ रायगड-अलिबाग ★

( पी.एम्.खोडका )
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग.

प्रति,

१. श्री. बी.के.हांडे, प्राधिकृत चौकशी अधिकारी, रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयासेवक सहकारी पतसंस्था मर्या., म्हाडा कॉलनी, पेण, जि.रायगड तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पेण, ता.पेण, जि.रायगड.
२.व्यवस्थापक, रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयासेवक सहकारी पतसंस्था मर्या., म्हाडा कॉलनी, पेण, जि.रायगड
३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पेण, ता.पेण, जि.रायगड.

जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग.